जा.क्र.पोआ / कक्ष -११(६)/२३०५ /२०२१
पोलीस आयुक्त कार्यालय , मुंबई
दिनांक - ९ / ०९ / २०२१

# आदेश

## पोलीस आयुक्त कार्यालय/ गणेश चतुर्थी /८१२(२)/ २०२१

विषय - फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे बंदी आदेश

(१) ज्या अर्थी कोविड -१९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार करता या वर्षी गणेशोत्सव साजरा करण्याबाबत महाराष्ट्र शासन , गृह विभाग मंत्रालय मुंबई यांनी आरएलपी -०६२१ /प्र.क . १४४/ विशा -१ ब दिनांक २९/०६/२०२१ अन्वये सार्वजनिक गणेशोत्सव २०२१ मार्गदर्शक सुचनां जारी करण्यात आलेल्या आहेत . व क्र. आरएलपी -०६२१ / प्र.क .१४४/ विशा -१ ब दिनांक ०८/०९/२०२१ अन्वये गणेश मुर्तीचे मुखदर्शन अथवा प्रत्यक्ष मंडपात येऊन दर्शन घेण्यास प्रतिबंध करण्यात येत असून दर्शन केवळ ऑनलाईन अथवा इलेक्ट्रानिक माध्यमाद्वारे उपलब्ध करून देण्यात यावे असे शुध्दीपत्रक जारी करण्यात आलेले आहे.

(२) लालबागचा राजा सार्वजनिक गणेश मंडळ हा मुंबईतील सर्वात महत्वाचा गणपती असल्यामुळे भाविकांची सर्वात जास्त गर्दी या ठिकाणी दर्शनासाठी नेहमी होत असते. यावर्षी शासनाने मुखदर्शन अथवा प्रत्यक्ष मंडपात येवून दर्शन घेण्यास मनाई केलेली आहे. लालबागचा राजा मुर्तीसमोर २० फुटापासून समोरील लालबागचा राजा मार्ग दुतर्फा किराणा, फरसाण, मसाला, ज्वलर्स, इत्यादी दुकाने आहेत. सदर दुकाने गणेशोत्सव कालावधीत उघडी राहिल्यास व्यापाऱ्यांची तसेच त्यांचे दुकानात येणाऱ्या गिऱ्हाईकांची आणि गिऱ्हाईकांच्या आड भाविकांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोठया प्रमाणावर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच शासनाने निर्गमित केलेल्या कोविड- १९ च्या मार्गदर्शक सुचनांचे उल्लघंन होवून कोरोना महामारीचा फैलाव होण्याची शक्यता आहे.

(३) त्याअर्थी मी चैतन्य एस . पोलीस उप आयुक्त, (अभियान), मुंबई शहर तथा विशेष प्राधि कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दि.०१/०४/१९७४ चे अधिसुचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी, म्हणुन मुंबई शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौ.दं.प्र.सं.(१९७३ चे कलम २) अन्वये दिनांक १०/०९/२०२१ ते १९/०९/२०२१ रोजी पर्यत लालबागचा राजा गणेश मुर्ती समोरील लालबाग राजा मार्ग मधील दोन्ही बाजूस असणारी दुकाने बंद ठेवण्याबाबतचा आदेश जारी करीत आहे . सदर आदेश हे पोलीस आयुक्त, बृहन्मंबई यांचे कार्यक्षेत्रात लागु राहतील. सदर मनाई आदेशात आयुक्त महानगरपालीका बृहन्मुंबई यांनी निर्गमित केलेल्या उपरोक्त आदेशातील सर्व अटी व शर्ती तसेच इतर निर्बंध कायम राहतील.

(४) सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ व प्रचलित कायद्यान्वये शिक्षेस पात्र राहिल.

(५) संबंधित आस्थापना यांना प्रत्येकास आदेशपुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौ.दं.प्र.सं.१९७३ चे कलम १४४(२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे . याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय, पोलीस उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक ०९/ ०९/२०२१ रोजी दिलेला आहे.

(चैतन्य एस.)
पोलीस उप आयुक्त,(अभियान)
पोलीस सह आयुक्त (का. व सु.),
मुंबई यांचेकरिता.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- ०९/०९/२०२१